# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

०३ जुलै, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)

# गोडपिपरी येथे दाखल खुनाच्या गुन्हयातील आरोपीला जन्मठेपीची शिक्षा

पोलीस स्टेशन गोंडपिपरी अंतर्गत खुन करणाऱ्या आरोपीस दि.०३/०७/२०२० रोजी **कोर्ट विद्यमान श्री. विरेन्द्र केदार, जिल्हा व सत्र न्यायाधीश , चंद्रपुर यांनी जन्मठेपीची** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन गोंडपिपरी हद्दीतील मौजा शिवणी ता. गोंडपिपरी जि. चंद्रपुर येथे दि.०८/११/२०१७ रोजी आरोपी सुनिल उर्फ रंजन भलवे याने मृतक ललीता फुलवतकर हिचा डोंगा दारु पिण्याकरीता दोन मित्रासह घेवुन गेला होता परत आल्यानंतर मृतक हीने माजा डोंगा दारु पिण्यास का नेला तुझी पोलीस रिपोर्ट करतो असे आरोपीस म्हटले असता दोघात भंडण झाल्याने मृतक ललीता हीचा माणेवर, डोक्यावर कुऱ्हाडीने गंभीर जखमीकरुन ठार मारले व तेथुन पळुन गेला यावरुन पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे अप.क्र. ५४८/२०१७ कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन सुनिल उर्फ रंजन बळीराम भलवे , वय २८ वर्ष रा. शिवणी (देशपांडे), तह. गोंडपिपरी, जि.चंद्रपुर यास अटक करुन सदर खुनाचा प्राथमीक तपास विलास सोनुले, पोलीस उपनिरिक्षक गोंडपिपरी, तसेच प्रविण बोरकुटे, सहा.पोलीस निरीक्षक यांनी केला त्यानंतरचा पुढील तपास शेखर देशमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी राजुरा यांनी गुन्हयाचा अनुषंगाने सविस्तर तपास करुन दोषारोप पत्र मा. न्यायालयात सादर करण्यात आले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ०३/०७/२०२० रोजी आरोपी **आरोपी नामे सुनिल उर्फ रंजन बळीराम भलवे , वय २८ वर्ष रा. शिवणी (देशपांडे), तह. गोंडपिपरी, जि.चंद्रपुर यास जन्मठेपीची शिक्षा तसेच ५,०००/—रू दंड न भरल्यास १ वर्षाचा कारावासाची शिक्षा कोर्ट विद्यमान श्री. विरेन्द्र केदार, जिल्हा व सत्र न्यायाधीश , चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. संदीप नागपुरे, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन नापोशि. निलरत्न उराडे, पोलीस स्टेशन गोंडपिपरी यांनी काम पाहिले.